# निवडणुक अभियान प्रचार डायरी - दि. 19.04.2014

**अरुण जेटली**
(विरोधी पक्षनेते, राज्यसभा)

**पंतप्रधानांचे भाषण?**

पंतप्रधान कचेरीतून नुकतीच दोन पुस्तके प्रकाशित करण्यात आली. त्या पुस्तकात मागील 10 वर्षात पंतप्रधानांनी दिलेल्या 1200 भाषणांचा समावेश करण्यात आला आहे. पंतप्रधान कचेरी असे मानते आहे की पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह एक “बोलका” पंतप्रधान नसल्याचा आरोप करण्यात येत आहे त्यासमोर हे पुस्तक प्रत्युत्तर आहे.

पंतप्रधान देशाचे महत्त्वाचे राजकीय प्रमुख आहेत. ते भारतीय लोकशाहीचा चेहरा आहेत. त्यांचे विचार नीतिंना आकार देतात. ते देशाचे नेतृत्व करतात. जनतेचे प्रश्न सोडवतात. पंतप्रधान पद खालचा होद्दा नाही. त्यांनी जनतेचा विश्वास मिळविलाच पाहिजे. त्यांनी शासक पक्षाच्या सहयोगी नेत्यांचा विश्वास मिळविला पाहिजे. त्यांनी दोन्ही नैतिक आणि राजकीय या दोन्ही बाबींचा समतोल राखला पाहिजे.

पंतप्रधान बोलका असलाच पाहिजे. त्यांनी लक्षपूर्वक सर्वांना साभाळले पाहिजे. त्यांनी एक नेता म्हणून भाषण दिले पाहिजे मात्र वाचक म्हणून नाही. अमेरिकेचे अध्यक्ष बराक ओबामा भारत भेटीवर आले असताना त्यांनी संसदेच्या सेंट्रल हॉलमध्ये महत्त्वपूर्ण भाषण दिले होते. त्यांच्या सन्मानार्थ आयोजित भोजन समारंभादरम्यान मला त्यांचे भाषण तयार करणा-यांसोबत काम करण्याची संधी मिळाली. त्यांचे भाषण निष्णात व्यक्तीकडून तयार करुन घेतले जाते आणि ते भाषण अधिका-यांच्या एका गटाकडून आणि शेवटी अध्यक्षांकडून तपासून घेतले जाते. अनेक भाषणे ही टेलीप्रॉम्प्टर वरुन वाचली जातात. टेलीप्रॉम्प्टरची पारदर्शक स्क्रीन असते. ज्यामुळे प्रेक्षकांना असे वाटते की ओबामा हे न वाचता भाषण करतात, परंतु संसदेच्या सेंट्रल हॉल मध्ये त्यांनी दोन टेलीप्रॉम्प्टरमधून वाचले होते. त्यांची बोलण्याची पद्धत परिणामकारक होती. भारताचे पंतप्रधान भाषण असे वाचतात की ते जनतेसाठी परिणामकारक नसते. ते भाषण लक्षात राहण्यासारखे नसते. असे पुस्तक बाहेर काढणे हे पंतप्रधान कचेरिचा अधिकार आहे. आकड्यानुसार सांगितले तर पंतप्रधानांनी अनेक भाषणे केलीत, पण वास्तविकपणे जनतेच्या ते लक्षात राहिले नाहीत.

**वडेरा यांना वॉल स्ट्रीट जर्नलमध्ये स्थान**

श्री रॉबर्ट वडेरा यांना वॉल स्ट्रीट जर्नलमध्ये स्थान मिळाले त्यासाठी त्यांचे अभिनंदन. वडेरांना व्यापार विश्लेषकाद्वारे तयार करण्यात आलेल्या बिझनेस मॉडेलमध्ये संशोधन पत्रात स्थान प्राप्त झाले आहे.

कोणत्याही गुंतवणूकीशिवाय बिझनेस सुरु करा. गुंतवणूक आणि राजकीय इक्वीटी समानार्थी शब्द आहे, जे लोन प्रमाणे वापरु शकतो. बाजारात मालमत्ता खरेदीसाठी त्या लोनचा उपयोग केला जातो. अनेक लोक मालमत्ता विकण्यास तयार होतात. अनेक लोक मूळ लोनची भरपाई करतात काही नाही करत. अशा प्रकारच्या बिझनेस मॉडेलनी लोकांमध्ये उत्सुकता निर्माण केली आहे. त्यामुळे गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. ते वॉल स्ट्रीट जर्नलने दाखविले आहे.

**अमृतसरमध्ये बिशन सिंह बेदी**

माझे मित्र बिशन सिंह बेदी अमृतसरमध्ये होते. यावेळची त्यांची भेट खुप वेगळी होती. ते भारताच्या इतिहासातील सर्वात अप्रामाणिक सरकारच्या राजकीय पक्षासाठी प्रचार करायला आले होते. ज्यांच्याविरोधात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याखाली आरोप आहे अशा उमेदवाराच्या प्रचारासाठी ते आले होते. बिशन सिंह नेहमी अभियान चालवणारे राहिले आहेत, पण यावेळी त्यांची चळवळ अनेतिक कारणासाठी होती.